## निशाणी ५ वरील आदेश
## सी.एन.आर.नं.एमएचपीयु–१८–००१९४२–२०२०

वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व कायम मनाई मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज वादीने नि. ५ वर 'दिवाणी प्रक्रिया संहिता' आदेश क्र. ३९ नियम १ व २ नुसार दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कलम १ मध्ये नमुद केलेली दावा मिळकत मौजे भांडगाव येथील गट नं. ४२/१ एकुण १ गुंठा क्षेत्रात वादीच्या पश्चिमाभिमुखी दोन खोल्या, त्या शेजारी खुले पत्रा शेड, संडास बाथरुम व त्या समोरील मोकळी वापरती जागा या दावा मिळकतीत वादीची ताबेवहिवाट आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दहा ते बारा वर्षापुर्वी मिळालेल्या गावठाण जागेतील अंदाजे सहा गुंठे जागेवर प्रतिवादी यांनी स्वतःला राहणेसाठी घराचे बांधकाम केले व त्याठिकाणी प्रतिवादी कायमस्वरुपी राहतात. सदर जागेची मालकी ग्रामपंचायतीची असली तरीही प्रतिवादी यांचे नावाची नोंद ग्रामपंचायत दप्तरी होवुन प्रतिवादी सदर मिळकती बाबत योग्य तो कर व घरपट्टी दरवर्षी ग्रामपंचायतीकडे भरतात. वादी हे उस्मनाबाद जिल्ह्यातुन येवुन भांडगांव येथे मोलमजुरी करण्याकरिता पंधरा ते वीस वर्षापासुन राहतात. वादी ने प्रतिवादी क्र. १ यांचेकडे त्यांना राहण्यासाठी प्रतिवादी क्र. १ च्या घरा समोरील एक गुंठा जागेची म्हणजेच दावा मिळकतीची घर बांधण्याकरिता मागणी केली व प्रतिवादीचा मुलगा रामदास दोरगे यास रक्कम रुपये १,३०,०००/– इतका मोबदला देवुन त्या जागेवर स्वतःचे घर बांधले. वादीस महावितरण बोर्डाने दावा मिळकतीमध्ये रितसर विज कनेक्शन दिले आहे. त्याकारणावरुन दि. २९.०७.२०२० रोजी प्रतिवादी क्र. १ व २ हे वादीस प्रतिवादीचे परवानगी शिवाय विज कनेक्शन का घेतले म्हणुन जागा सोडणे बाबत वारंवार धमकी देत आहेत. वादी यांच्या नावाची नोंद १०/१२/२०१८ रोजी ग्रामपंचायत मासीक सभेत ठराव क्र. ५ पारीत करुन दावा मिळकतीस ग्रामपंचायत दप्तरी झालेली आहे. अशा प्रकारे वादी हे दावा मिळकतीमध्ये सन २०१३ पासुन आजतागायत वास्तव्यास होते व आहेत. तथापी वादीच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस प्रतिवादी क्र. १ ते ३ हे हरकत अडथळा करत असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द तुर्तातुर्त मनाई करिता मागणी केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे प्रस्तुत अर्जास नि. २८ वर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, भांडगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ४२ मधील गावठाणातील सहा गुंठे जागेमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी १०६८ चौ.फु इतके बांधकाम सन २००३–२००४ मध्ये करुन सदर घर मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या ताबेवहिवाटीस आहे. सदर मिळकतीची नोंद ग्रामपंचायत दप्तरी सन २००४–

२००५ चे दरम्यान रितसर ठराव पारीत होवुन झालेली आहे. त्याचप्रमाणे गट नंबर ४२ मधील ४५८४ चौ.फु बखळ जागेची नोंद देखील प्रतिवादी क्र. २ यांचे नावे ग्रामपंचायत दप्तरी सन २०१३–२०१४ मध्ये होवुन सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांचे ताबेवहिवाटीस आहे. सदर मिळकतीबाबतचा महसुल प्रतिवादी क्र. २ नियमीतपणे भरतात. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण यांचेकडील विज कनेक्शन प्रतिवादी क्र. २ यांचे नावे सदर मिळकतीमध्ये स्वतंत्रपणे आहे परंतु, वादी यांची प्रतिवादी क्र. २ यांचे अपरोक्ष प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचेशी संगनमत करुन प्रतिवादी क्र. २ यांची जागा हडपण्याच्या दुष्ट हेतुने सदर मिळकतीबाबत तथाकथीत संमती पत्रावरुन ग्रामपंचायत दप्तरी वादीच्या नावाची नोंद करुन घेतलेली होती. सदर वाद प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना माहित असताना देखील कोणतीही नोटीस न काढता त्यांचे अपरोक्ष प्रतिवादी क्र. २ यांचे नाव काही क्षेत्रास कमी करुन वादीचे नावाची नोंद करण्यात आलेली आहे. वादी यांन कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीचा ताबा मिळालेला नाही. वादी यांचे नावाची नोंद दावा मिळकतीस झालेबाबत माहिती मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांनी वादी यांचे नावाची नोंद कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाली तसेच सदरची नोंद कमी होवुन प्रतिवादी क्र. २ यांचे नाव पुर्वीप्रमाणे दावा मिळकतीस नमुद करणेबाबत अनुक्रमे दि. २०/०७/२०२० व १०/०८/२०२० रोजी तक्रारी अर्ज दाखल केले आहे परंतु, ग्रामपंचायत दप्तरी प्रतिवादींच्या अर्जाची कोणतीही दखल न घेतल्याने दि. २०/०८/२०२० रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांचेकडे प्रतिवादीने तक्रारी अर्ज दिलेला आहे. सदर अर्जामध्ये सुनावणी होवुन दि.१२/०३/२०२१ रोजी असा आदेश पारीत केला आहे की, 'सौ.सुभद्रा वसंत दोरगे म्हणजेच प्रतिवादी क्र. २ यांचे नाव कर आकारणी यादीस भोगवटा सदरी असताना त्यांचा मुलगा रामदास वसंत दोरगे यांनी सौ. कलबुर्गी यांना संमतीपत्राने जागा दिलेली दिसुन येते. श्री. रामदास वसंत दोरगे यांना सदर जागा विकण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नसताना त्यांनी केलेला व्यवहार विधीग्राह्य ठरणार नाही.' अशा प्रकारे गट विकास अधिकारी यांनी वादीची नोंद कायदेशीर नसलेबाबत आदेश केलेला आहे. सबब वादी यांना प्रतिवादींविरुध्द तथाकथीत बेकायदेशीर संमतीपत्राव्दारे झालेल्या ग्रामपंचायत नोंदीवरुन या प्रतिवादी यांचेविरुध्द जाहीर ठराव व निरंतर मनाई मागण्याचा अधिकार नाही. सबब वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केली आहे.

४. वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी.के.दिवेकर यांनी व प्रतिवादीं तर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.भोईटे यांनी युक्तीवाद केला आहे.

५. वादी व प्रतिवादींचे कथन व संबंधीत विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन मी खालील मूद्दे निश्चित करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय? | नाही. |
| २ | न्यायाचा तराजु वादीचे बाजूने आहे काय? | नाही. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमीत असे पैशाने भरुन न निघणारे नुकसान होणार काय? | नाही. |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्या क्र. १ ते ३

६. दावा प्रलंबित असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजुर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधीन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधीकार वापरताना खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक असते. अ) वादींना सकृतदर्शनी केस आहे का? ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? आणि क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल का?

७. वादी व प्रतिवादींचे कथनाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट नंबर ४२ मधील सहा गुंठे क्षेत्र हे गावठाणातील असुन ग्रामपंचायत भांडगाव यांचे मालकीचे आहे. दाव्याचे कामी गट नंबर ४२ संदर्भात दाखल करण्यात आलेल्या महसुल कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांनी कथन केल्याप्रमाणे संबंधीत क्षेत्रास वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद ग्रामपंचायत मासीक सभा ठरावाप्रमाणे भोगवटादार सदरी केलेली दिसुन येते. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी हे संबंधीत क्षेत्राचा ग्रामपंचायत कर भरत असलेबाबत दिसुन येते. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये स्वतः कथन केले आहे की, दावा मिळकत ही ग्रामपंचायत भांडगाव यांचे मालकीची गावठाणाची मिळकत असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दावा मिळकत वादी यांना देण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. वादींचे नावाची नोंद दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी झालेबाबत केलेल्या तक्रार अर्जावरील आदेशामध्ये गट विकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी वादींना दावा मिळकत विक्री केल्याचा व्यवहार विधीग्राहय नाही असे नमुद केले आहे. दावा मिळकतीचे स्वरुप पाहता तसेच कागदोपत्री पुराव्यावरुन दावा मिळकतीच्या चतुःसिमा तसेच वादींचे दावा मिळकतीतील कोणत्या क्षेत्रामध्ये घर मिळकत आहे व कोणत्या क्षेत्रात ताबेवहिवाट आहे याबाबत बोध होत नाही. तसेच वादींची दावा मिळकतीमध्ये ताबे वहिवाट असलेबाबत गृहीत धरले असता सदर ताबेवहिवाट बेकायदेशीर असल्याने अशी ताबेवहिवाट कायद्याने संरक्षीत करणे न्यायोचित नाही. दावा

मिळकत ग्रामपंचायत भांडगाव यांचे मालकीची गावठाणाची मिळकत असल्याने त्याबाबत कोणताही व्यवहार वादी अथवा प्रतिवादी यांना योग्यत्या अधिका–यांच्या परवानगीने दावा मिळकत नियमीतीकरण केल्याशिवाय करता येणार नाही.

८. प्रस्तुतचा दावा दाखल करुन वादी हे त्यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडुन तथाकथीत दावा मिळकत खरेदी केलेबाबत नमुद करुन दावा मिळकत ही नियमीतीकरण केल्या शिवाय कोणालाही खरेदी करण्याचा अधिकार नसताना करण्यात आलेल्या बेकायेदशीर व्यवहाराबाबत कायदेशीर दाद मागण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसुन येते.

९. अभिलेखावर दाखल वादी व प्रतिवादीचे कथन व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रथमदर्शनी वादीने प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई मागणेबाबत केस शाबीत केलेली नाही. सबब वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नसल्याने न्यायाच्या तुळाचे पारडे वादीच्या बाजूने झुकत आहे असे वादीने सिध्द केलेले नाही. मनाई हुकूम न दिल्यास वादींचे पैशाने भरुन न येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे हे शाबीत केले नाही. वरिल सर्व बाबींचा विचार विमर्श करुन माझे प्रथमदर्शनी असे मत होत आहे की, वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४:</u>**

१०. वरिल मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षाला अनुसरुन मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबद्दल कोणताही आदेश नाही.

ठिकाण : दौंड :
दि. १३/०४/२०२२

(ए.जी.कुलकर्णी)
३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

**नियमीत दिवाणी दावा क्र.१७६/२०२०**
**रेखा उर्फ सुरेखा वि. वसंत व इतर**
**नि.क्र. ५ वरील आदेश**

## <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | आर.आर.क्षिरसागर |
| कोर्टाचे नांव | :: | ए.जी.कुलकर्णी<br>३रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड<br>ता. दौंड, जि. पुणे. |
| दिनांक | :: | १३/०४/२०२२ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | १३/०४/२०२२ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | १३/०४/२०२२ |